# GOVRNMENT POLYTECHNIC, BRAHMAPURI

**Dist: Chandrapur Pin: 441206**

Phone: 07177- 272112,272166

Email- office.gpbramhapuri@dtemaharashtra.gov.in , principal.gpbramhapuri@dtemaharashtra.gov.in


## दैनिक वृत्तपत्र लोकमत (हॅलो चंद्रपूर) व नवभारत मध्ये शनिवार दि. 11 मे, 2019 रोजी प्रकाशित झालेली जाहीरात – <u>सुरक्षा रक्षक पदाकरीता निविदा सूचना</u>



शासकीय तंत्रनिकेतन, ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर

☎ (०७१७७) - २७२११२ फॅक्स-२७२१६६

ई-मेल - office.gpbramhapuri@dtemaharashtra.gov.in

क्रमांक - शातंनिब/आस्था-२/निविदा/सुरक्षारक्षक/२०१९/१४१०          दिनांक - १०/०५/२०१९

**सुरक्षारक्षक पदाकरीता निविदा सुचना**

या संस्थेस दरमहा ठोक रक्कमेवर १० सुरक्षारक्षक (०७ पुरूष, ०३ महिला) कंत्राटी पध्दतीने अनुभवी व नोंदणीकृत एजन्सी मार्फत कंत्राटदार यांचेकडून ११ महिन्यासाठी करार करण्याकरीता दि. २२/०५/२०१९ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत सिलबंद लिफाफ्यात निविदा मागविण्यांत येत आहेत. निविदा दि. २३/०५/२०१९ रोजी, दुपारी ०३.०० वाजता उघडण्यात येतील. निविदा (अटी व शर्ती) अर्जाची किंमत रू. १०००/- रोख भरून अर्ज कार्यालयातून (कार्यालयीन कामाचे दिवशी) प्राप्त करून घ्यावे किंवा निविदा अर्ज संस्थेच्या संकेतस्थळ **www.gpbramhapuri.edu.in** यावर देखील उपलब्ध आहे.

प्राप्त होणाऱ्या निविदांपैकी कोणतीही एक निविदा मंजूर करणे किंवा सर्व निविदा नामंजूर करणेबाबतचे प्राधिकार राखून ठेवण्यात येत असून त्याबाबत कारणे देणे बंधनकारक राहणार नाही.

स्वा/-
(डॉ. एम. बी. डायगव्हाणे)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, ब्रम्हपुरी

GOVRNMENT POLYTECHNIC, BRAHMAPURI
Dist: Chandrapur Pin: 441206
Phone: 07177- 272112,272166
Email- office.gpbramhapuri@dtemaharashtra.gov.in , principal.gpbramhapuri@dtemaharashtra.gov.in

# १ जून २०१९ ते ३० एप्रिल २०२० या कालावधीकरिता शासकीय तंत्रनिकेतन ब्रम्हपुरी या संस्थेच्या परिसराच्या सुरक्षेकरिता २४ X ७ कंत्राटी सुरक्षा रक्षकांच्या सेवा पुरवठा करणेकरिता निविदा प्रपत्रे

प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, ब्रम्हपुरी यांचे कार्यालय
खेड मक्ता, नागभीड रोड, ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपूर, ४४१२०६
ई-मेल:- office.gpbramhapuri@dtemaharashtra.gov.in

२४ X ७ कंत्राटी सुरक्षा रक्षकांच्या सेवा पुरवठा करणेकरिता दरकरार

सन २०१९-२०२०

कालावधी ०१ जून २०१९ ते ३० एप्रिल २०२०

सादर करणार :-

सही :-

नाव :-

संपूर्ण पत्ता :-

फोन क्रमांक :-

दूरध्वनी क्रमांक :-

निविदा फॉर्म त्या संबंधीच्या नियम, अटी व शर्ती संस्थेमध्ये उपलब्ध असून त्याची किंमत रुपये १०००/- (अक्षरी रुपये एक हजार फक्त) इतकी नापरतावा (Non Refundable) आहे. तसेच सदर निविदा फॉर्म अहस्तांतरणीय आहे. निविदा भरण्याची अंतिम तिथी दिनांक २२/०५/२०१९ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील. प्राप्त झालेल्या निविदा दिनांक २३/०५/२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येतील.

२४ X ७ कंत्राटी सुरक्षा रक्षकांच्या सेवा पुरवठा करणेकरिता दरकरार
कालावधी ०१ जून २०१९ ते ३० एप्रिल २०२०

## परिशिष्ठ - अ

निविदेसोबत जोडावयाच्या कागदपत्रांची चेकलिस्ट

१. संस्थेच्या/ एजंसीच्या लेटरहेडवर अथवा शिक्का असलेल्या कागदावर निविदाकाराच्या सही व शिक्क्यासह संस्थेची/एजंसीची माहिती असलेले विवरणपत्र
२. सुरक्षारक्षक पुरवठादार असल्याच्या अधिकृत परवान्याची साक्षांकित प्रत. (PSARA Certificate)
३. नियम व अटी (नाव पत्ता व स्वाक्षरी करून परिशिष्ठ ब)
४. अनामत रक्कम रु. 20,000/- (Demand Draft च्या स्वरूपात)
५. पॅनकार्डची साक्षांकित प्रत
६. निविदाधारकाचे स्वाक्षरी केलेले प्रतिज्ञापत्र
७. दरपत्रक (परिशिष्ट क)
८. निविदा धारकाचे E.P.F.O. REGISTRATION (EMPLOYEES PROVIDENT FUND ORGANIZATION) कामगार यांचे भविष्य निधी नोंदणी दाखला प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत.
९. पोलीस आयुक्तांच्या परवान्याची साक्षांकित प्रत.
१०. E.S.I.C. REGISTRATION (EMPLOYEES STATE INSURANCE CORPORATION ) कर्मचारी राज्य विमा पंजीकरण
११. BOMBAY SHOP AND ESTABLISHMENT ACT (GUMASTA LICENCE) आस्थापनेच्या नूतनीकरणाचा दाखला.
१२. G.S.T. REGISTRATION (GOODS & SERVICE TAX ) व मागील २ वर्षाचे सर्विस टॅक्स भरल्याचे विवरणपत्र
१३. निविदा सूचनेमध्ये नमूद केलेल्या सेवेचे अनुभव प्रमाणपत्र (EXPERIENCE CERTIFICATE)
१४. वार्षिक उलाढाली संदार्भातील दस्तावेज (मागील ०३ वर्षे)

# २४ X ७ कंत्राटी सुरक्षा रक्षकांच्या सेवा पुरवठा करणेकरिता दरकरार
# कालावधी ०१ जून २०१९ ते ३० एप्रिल २०२०

## परिशिष्ठ - ब

## सुरक्षारक्षक सेवा पुरविण्याबाबत नियम व अटी

प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन ब्रम्हपुरी यांचे कडून दिनांक ०१ जून २०१९ ते ३० एप्रील २०२० या कालावधीकरिता संस्थेचे प्रक्षेत्र व प्रक्षेत्राच्या परिसरातील मालमत्तेच्या सुरक्षेकरिता व ई. अनुषंगिक कामे करण्याकरिता, कंत्राटी २४x७ (७ पुरुष + ३ स्त्रीया = एकूण १०) सुरक्षा रक्षकांच्या सेवा पुरवठा करणे करिता, दोन लिफाफा पध्दतीचा अवलंब करुन सर्व नोंदणी कृत संस्था (बेरोजगार सेवा पुरवठा सहकारी संस्था / बचत गट, इत्यादी) यांचे कडून दिनांक २२/०५/२०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत निविदा मागविण्यात येत आहे .निविदा धारकाकडे सुरक्षा रक्षक पुरावठादार असल्याच्या अधिकृत परवाना (नोंदणी) व पोलीस विभागाची अनुज्ञप्ती असणे आवश्यक आहे.

१. निविदा फॉर्म ची किमत रुपये १०००/- फक्त (नापरतावा / Non Refundable) इतकी असून शुल्क अदा करून फॉर्म घेता येतील. निविदा फॉर्म पोस्टाने उपलब्ध होणार नाहीत.

२. निविदा धारकाने निविदे सोबत रुपये २०,०००/- (अक्षरी रुपये वीस हजार फक्त) इतकी परतावायोग्य (Refundable) अनामत रक्कम (Earnest Money Deposit) डिमांड ड्राफ्टने जमा करावी लागेल. डिमांड ड्राफ्ट प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन ब्रम्हपुरी यांचे नावे ब्रम्हपुरी येथे देय असावा. अनामत रक्कम जमा न केल्यास निविदा स्वीकारण्यात येणार नाही.

३. दिनांक २२/०५/२०१९ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत निविदा संस्थेमध्ये स्वीकारण्यात येतील त्यानंतर कोणतीही निविदा स्वीकारण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

४. निविदेसोबत पुरवठादार / ठेकेदाराकडून कुठलीही अट स्वीकारली जाणार नाही.

५. सदर निविदा निविदाधारक किंवा त्यांचे प्रतिनिधींच्या हजेरीत २३/०५/२०१९ रोजी दुपारी ०३.०० वाजता निविदा समितीसमोर उघडण्यात येतील. निविदा समितीचा निर्णय अंतिम व निविदा धारकांवर बंधनकारक राहील.

६. निविदा भरतेवेळी खालील बाबी महत्वाच्या असून त्यांची पूर्तता न झाल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

७. कंत्राटी २४x७ (आठवडाभर कुठलीही सुट्टी न घेता) कंत्राटदारास या कंत्राट कालावधीकरिता एकाच दर राहील या प्रमाणे एकूण प्रति व्यक्ती प्रति दिवस (सर्व प्रकारच्या करासह) एका पाकिटात नमूद करून सिलबंद पाकिटावर दरपत्रक असे नमूद करावे व दुसऱ्या पाकिटामध्ये आवश्यक सर्व दस्तावेज सादर करावे. त्या सीलबंद पाकिटावर ठळक अक्षरात दस्तावेज , कंत्राटदाराचे नाव नमूद करावे. कोणत्याही कंत्राटदाराकडून सदर दोन पाकिटे, वरील प्रमाणे नमूद न करता किंवा त्यामधील दस्तावेज नमूद प्रमाणे नसल्यास निविदा अवैध ठरविण्यात येईल.

८. लिफाफा क्र. 2 BoQ Template (Bill of Quantities-Price Bid) (परिशिष्ठ क) मध्ये कोणतेही बदल करु नयेत अन्यथा आपली निविदा नामंजुर करण्यात येईल.

९. कोणतिही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे बाबतचा हक्क निविदा समीतीस राहील. त्या संबंधी कारणे किंवा खुलासा देण्याची जवाबदारी कमेटी वर राहणार नाही. ज्या दरपत्रक धारकाची निवीदा मंजुर होईल त्यांना दर कराराची मुदत संपल्यानंतर कोणतेही तक्रार नसल्यांस तीन महिन्या नंतर ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल.

१०. निविदा धारकाने दिलेला दर मंजूर झाल्यानंतर कोणत्याही कारणास्तव वाढवून दिला जाणार नाही. पूर्ण कालावधीसाठी एकच दर स्वीकारण्यात येईल व त्यात कोणताही बदल करता येणार नाही.

११. कंत्राटी २४x७ (आठवडाभर कुठलीही सुट्टी न घेता ) तास सुरक्षा रक्षकांच्या सेवा पुरवितांना प्रक्षेत्राच्या सुरक्षेसाठी सेवेत कुठल्याही प्रकारचा चा खंड पडता कामा नये. हि बाब मंजूर निविदा धारकाला बंधनकारक राहील. सुटी / रजा देय राहणार नाही. निविदा धारकाने रजेच्या दिवशी पर्यायी व्यवस्था करणे बंधनकारक राहील. अन्यथा त्या दिवसाचा मोबदला व तेवढाच दंड संबंधित महिन्याच्या देयकातून कमी करण्यात येईल.

१२. ज्या दरपत्रक धारकाची निविदा मंजूर होईल, त्यांना त्याच दराने विभागीय तंत्रशिक्षण संचालनालय, नागपूर अधिनस्थ असलेल्या इतर संस्थाना आवश्यकतेनुसार सेवेचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

१३. ज्या कंत्राटदाराचे / संस्थेचे दरपत्रक मंजूर करण्यात येईल त्यांना कंत्राटी २४ X ७ (आठवडाभर कुठलीही सुट्टी न घेता सुरक्षा रक्षकांच्या सेवा पुरविण्या बाबतचा करारनामा रुपये १००/- च्या शासकीय स्टॅम्प पेपरवर लिहून द्यावे लागेल. ज्यांनी करारनामा केला नाही किंवा २४ X ७ सुरक्षा पुरविण्यास असमर्थता दर्शविली त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१४. सेवा पुरविण्याचा कार्यादेश दिल्यानंतर लगेच प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन ब्रम्हपुरी यांना सेवा पुरवाव्या लागतील.

१५. देयकाचे भुगतान उपलब्ध आर्थिक तरतुदी नुसार देण्यात येईल.

१६. देयकाच्या रकमेवर प्राप्तीकर किंवा आयकर नियमानुसार वेळोवेळी वसूल करण्यात येईल.

१७. सन २०२०-२१ मध्ये नविन दरकरार करताना प्रशासकिय अडचणी मुळे दर करार न झाल्यास ह्याच दरकरारास प्रथम तीन महिन्यांची मुदत वाढ देण्यात येईल व त्या नंतर गरज भासल्यास पुन्हा तीन महिने म्हणजे एकुण सहा महिनेपर्यंत मुदत वाढ देण्यात येईल व हे कंत्राटदारावर बंधनकारक राहिल.

१८. या संस्थेच्या दैनंदिन कामासाठी कार्यालयाचे आदेशा नुसार निर्धारित गुणवत्तेच्या सेवा नियमितपणे पुरविणे आवश्यक आहे.

१९. कार्यालयाच्या स्थावर व जंगम मालमत्तेच्या नुकसानी बाबत अथवा चोरी, अनैतिक वर्तणूक आढळून आल्यास त्या ठेकेदार संस्था व संबंधितावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल व होणाऱ्या नुकसानीची भरपाई कंत्राटदाराकडून करून घेण्यात येईल.

२०. प्रक्षेत्रावर काम करण्याऱ्या कर्मचाऱ्याचा विमा करणे हि कंत्राटदारा ची जबाबदारी आहे.

२१. प्रक्षेत्रावर काम करीत असतांना तेथे काम करणा-या व्यक्तीला अपघात झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही व त्या प्रित्यर्थ कोणतीही नुकसान भरपाई मिळणार नाही.त्यामुळे सुरक्षेची सर्व काळजी घेवूनच कामे करण्यात यावीत.

२२. कंत्राटदार संस्थेने शक्यतो आपले कर्मचारी बदलू नयेत अपरिहार्य कारणास्तव बदल करने आवश्यक असल्यास या कार्यालयास कळवून पुर्वपरवानगीने नवीन कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देवून बदल करण्यात यावा.

२३. काम समाधान कारक नसल्यास ,सदरील करार रद्द करण्याचे अधिकार कुठलीही पूर्वसूचना न देता या कार्यालयास राहतील.

२४. निविदा धारकाने संपूर्ण करांसह दर भरावे.

२५. प्रक्षेत्राच्या आवश्यकतेनुसार कार्यालय प्रमुखाच्या निर्देशानुसार काम करणे बंधनकारक राहील.

२६. कामाचे नियोजन / व्यवस्थापन प्रक्षेत्रावरील अपेक्षित कामाच्या वेळेनुसार व वेळापत्रकानुसार राहील व वेळप्रसंगी कामाचे नियोजन शिफ्ट नुसार करावे लागेल.

२७. सुरक्षा रक्षकांनी नशापाणी करून येवू नये,गैरवर्तन/असभ्य वर्तन आढळून आल्यास त्यास त्वरित कामावरून कमी करणे हे कंत्राटदाराला बंधनकारक राहील

२८. प्रक्षेत्रावरील सुरक्षा कर्मचाऱ्यांनवर प्रक्षेत्रावर असलेले विद्युत उपकरणे वेळेवर बंद व सुरु करण्याची जबाबदारी राहील.

२९. प्रक्षेत्रावरील कार्यालय ,शेड ईत्यादि ईमारतीचे कुलूप व्यवस्थित लागली आहे किवां नाही हे बघण्याची जबाबदारी प्रक्षेत्रावरील सुरक्षा कर्मचाऱ्यांनवर राहील.

३०. सुरक्षा रक्षकाची ड्यूटी ८ तासाची राहील.आकस्मिक बाब वगळता सुरक्षा रक्षकाची ड्यूटी ८ तासापेक्षा जास्त होत असल्यास ते अटी शर्ती भंग समजून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

३१. सुरक्षा रक्षकाचा दर पूर्ण महिन्याचा असावा . सुटीचे दिवसी वेगळा सुरक्षा रक्षक लावल्यास त्याचे वेगळे बिल देण्यात येणार नाही .

३२. **सुरक्षा रक्षक असताना संस्थेचे / प्रक्षेत्राचे नुकसान झाल्यास मंजूर निविदा संस्था जबाबदार राहील. होणाऱ्या नुकसानीची भरपाई कंत्राटदाराकडून करून घेण्यात येईल.**

३३. **कंत्राटदाराकडून कंत्राटी कामगाराला देण्यात येणारे वेतन = वेतन + विशेष भत्ता + बोनस + ईपीफ + ईएसआय + पी.टी. + सेवाकर + सेवा शुल्क + ईतर शुल्क ईत्यादी मिळून होणारी रक्कम असावी.**

३४. **निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे तसेच दर प्रक्रिया संयुक्तिक वाटत नसल्यास रद्द करून परत निविदा मागविण्याचे पूर्ण अधिकार निविदा समितीच्या वतीने अध्यक्षाला राहील.**

३५. सुरक्षा रक्षक यांच्या सेवा कंत्राट झाल्यापासून ११ महिन्याचा कालावधीसाठी २४ X ७ (आठवडाभर कुठलीही सुट्टी न घेता) लावले जातील कामाचे स्वरूप /कार्य तत्परता बघुनच पुनश्च पुढील कालावधीसाठी करार सुरु ठेवण्याचा विचार केला जाईल.

३६. सुरक्षा रक्षक हे तीन पाळीत काम करतील. ( प्रत्येकी ०८ तासाप्रमाणे ) त्यांना ड्रेस, शिटी, दंडा (काठी) व बॅटरी व त्यासाठी लागणारे सेल इत्यादी बाबी सुरक्षा रक्षकास पुरविण्याची जबाबदारी आपली राहील. सदर साहित्य दर महीन्याचे १ तारखेला किंवा १५ तारखेला सार्वजनिक सुटटी असल्यास यापुढील लागूनच असलेल्या कार्यालयीन दिवशी कामकाजाचे दिवशी सुरक्षा समिती व प्राचार्यांना प्रत्यक्ष दाखविणे आवश्यक असुन टार्च, शिटटी सुस्थितीत असावी.

३७. संस्थेत कार्यरत सुरक्षा रक्षकाच्या नावे कोणत्याही पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल नसावा.

३८. **सुरक्षारक्षक हे शारीरिक दृष्ट्या सक्षम व मजबूत बांध्याचे असावेत व त्यांचे वय २२ ते ४० या वयोगटातील असावे**

३९. **सुरक्षा रक्षकास हिंदी, मराठी भाषेचे किमान बोलणे / लिहिण्या वाचण्याजोगे ज्ञान असणे आवश्यक आहे.**

४०. **सुरक्षा रक्षकांच्या कोणत्याही प्रकारची निवासाची व्यवस्था संस्थेतर्फे केली जाणार नाही.**

४१. **सुरक्षा रक्षकांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या १० सुरक्षा रक्षकामधून एका सुरक्षा रक्षकाची नियुक्ती पर्यवेक्षक म्हणुन कंपनीतर्फे करण्यात यावी व इतर सुरक्षा रक्षकास जे मानधन देय राहील तेच मानधन सदर पर्यवेक्षकास देय राहील.**

४२. दिवसाच्या सुरक्षा रक्षकाने (सकाळ/संध्याकाळ) संस्थेतील सर्व ग्रील गेटस/मेनगेट/लाईट बंद करून संस्थेची मुख्य चावी प्राचार्य/प्रबधक यांचेकडे जमा करणे तथा पुनश्च वेळेवर चावी घेऊन उघडणे इत्यादी कामे करावी लागेल. संस्था बंद होतांनी विविध विभागाच्या किल्ल्या रजिस्टर मध्ये नोंद करुन स्विकारणे व सर्व विभागाच्या किल्ल्याचा बॉक्स वसतिगृह प्रमुख/प्राचार्य/नेमुन दिलेले अधिकारी यांचेकडे निवासस्थानी पोहचता करणे तसेच सकाळी ७.०० वाजता किंवा ९.०० वाजता वसतिगृह प्रमुख/प्राचार्य/नेमुन दिलेले अधिकारी यांचे निवासस्थानाहुन किल्ल्याचा बॉक्स आणून विभागाचे कर्मचायांना देणे व त्याची नोंद ठेवणे.

४३. **संस्थेच्या विद्यार्थ्यांवर शिस्त विषयक नियंत्रण ठेवणे तसेच अनधिकृत अथवा संशयास्पद विद्यार्थी व व्यक्ती यांना संस्थेच्या आवारात येण्यास प्रतिबंध करणे.**

४४. **गाई, म्हशी, जनावरे इत्यादी शासकीय तंत्रनिकेतनच्या आवारात बांधण्यास व येण्यास प्रतिबंध करणे व त्या अनुषंगाने कार्यवाही करणे.**

४५. **शासकीय तंत्रनिकेतनच्या परिसरातील वृक्ष बाहेरील व्यक्ती कडून तोडण्यास प्रतिबंध घालणे व नियमाचे उल्लंघन केल्यास त्या अनुषंगाने कार्यवाही करणे.**

४६. **शासकीय तंत्रनिकेतन, ब्रम्हपुरी च्या परिसरात अतिक्रमण रोखण्यास आवश्यक ती कार्यवाही करणे.**

४७. **सुरक्षा रक्षकांना सायंकाळी ६.०० ते सकाळी ६.०० प्रत्येक तासाला ठोके द्यावे लागतील.**

४८. **कार्यालयीन वेळेनंतर व सुट्टीच्या दिवशी दूरध्वनी / टपाल / संदेश आल्यास सुरक्षारक्षकांना तो लगेच प्राचार्यांकडे पोहोचवून द्यावा लागेल.**

४९. महिना भरल्यानंतर सुरक्षा रक्षकास देय होणारे बिल ०५ ते १५ तारखेपर्यंत अनुदान उपलब्धतेनुसार दिल्या जाईल. एखादे महिन्यात शासकीय अनुदान उपलब्ध नसल्यास आपले सुरक्षारक्षकास देय होणारे बिल देण्यास विलंब लागल्यास सुरक्षा रक्षकास आपणाकडून बिल अदा करणे बंधनकारक राहील. त्यांना वेळेवर वेतन न मिळाल्यास व त्यांनी तशी तक्रार केल्यास एजन्सीवर योग्य कार्यवाही होऊ शकते.

५०. संस्थेच्या सुंदरतेसाठी सुरक्षा रक्षकास सकाळी संस्थेच्या दर्शनी भागातील बगीचाला पाणी टाकणे तसेच सुरक्षेच्या दृष्टीने वेळेवर दिलेले आदेश पालन करणे बंधनकारक राहील.

५१. आपले एंजसी मार्फत या संस्थेत कामावर असलेल्या सुरक्षारक्षकांना भविष्यात शासन सेवेत नियमीत पदावर दावा करता येणार नाही /करण्यात येणार नसल्याचे हमीपत्र एंजसीनी कामगाराकडून घेवून संस्थेस सादर करावे लागेल.

५२. लावलेल्या सुरक्षारक्षकाचा फोटो तथा संपूर्ण माहिती पत्ता व मोबाईल क्रमांकासह संस्थेकडे देणे बंधनकारक राहील.

५३. संस्थेची पाणीपुरवठा व्यवस्थेवर नियंत्रण ठेवणे रोज सकाळी संस्थेतील, वसतिगृहातील, कर्मशाळेतील सर्व निवासस्थानामधील पाण्याच्या टाक्या भरणे, विद्युत व पाणी याचा अपव्यय टाळणे तसेच परिसरातील रात्री सुरक्षेच्या दृष्टीने दिवे लावण्याची व्यवस्था करणे.

५४. प्रत्येक कागदपत्रावर पान क्रमांक नमूद करण्यात यावा तसेच एकूण पाने खालीलप्रमाणे स्वतंत्र कागदावर प्रमाणित करावे. " प्रमाणित करण्यात येते की, मी सादर करीत असलेल्या निविदेसोबत एकूण ..... पाने तांत्रिक छाननिकारिता सोबत जोडत आहे"

55. वर नमूद केलेल्या अटींचे कंत्राटदारा कडून कटाक्षाने पालन न झाल्यास व करार पालन करताना उपस्थित झालेल्या वादग्रस्त मुद्द्यांवर मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर व त्यानंतर व त्यानंतर मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचा निर्णय अंतीम व सर्वांना बंधनकारक राहील. व यापुढे तंटा उद्‌भ्वल्यास ब्रम्हपुरी मा. न्यायालयाचे कार्यक्षेत्रात सोडविण्यात येईल.

(डॉ. म. भा. डायगव्हाणे)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, ब्रम्हपुरी

वरील सर्व अटी व नियम मला मान्य आहेत.
कंत्राटदाराची स्वाक्षरी:-

कंत्राटदाराचे नांव:-

पत्ता:-

# प्रतिज्ञापत्र

मी ...........................................................................................................................

राहणार .................................................................................................................................

.............................................................................................................................................

निविदा धारक, शासकीय तंत्रनिकेतन,खेड मक्ता, नागभीड रोड, ब्रम्हपुरी या संस्थेसाठी २४ X ७ (आठवडाभर कुठलीही सुट्टी न घेता) सुरक्षा रक्षकांच्या सेवा पुरवठा करणे संबंधी निविदा सादर करीत आहे.

मी सोबत जोडलेली माहिती चुकीची / खोटी आढळल्यास माझे दरपत्रक रद्द करण्यात यावे

मी निविदा संबंधित सर्व नियम, अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचलेल्या असून त्या सर्व मला बंधनकारक राहतील तसेच सर्व अटी व शर्तीवर मी स्वाक्षरी केलेली आहे.

कंत्राटदाराचे नाव व स्वाक्षरी

कंत्राटदाराचा दूरध्वनी क्रमांक.

ठिकाण:-

दिनांक:-

## २४ X ७ कंत्राटी सुरक्षा रक्षकांच्या सेवा पुरवठा करणेकरिता दरकरार कालावधी ०१ जून २०१९ ते ३० एप्रिल २०२०

### परिशिष्ट-क

### दरपत्रक - तपशील

१) दरपत्रक स्वीकारण्याची अंतीम तारीख व वेळ :- २२/०५/२०१९ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत

२) दरपत्रक उघडण्याची तारीख व वेळ :- २३/०५/२०१९ दुपारी ०३.०० वाजता

३) दरपत्रक भावबंद कराराचा कालावधी:- ०१ जून २०१९ ते ३० एप्रिल २०२० (पुढील नवीन भावबंद करार होईपर्यंत )

| अ.क्र | कंत्राटीपद | वेतन | विशेष भत्ता | ईपीफ | ईएसआय | पी.टी | सेवाकर | सेवा शुल्क | ईतर शुल्क | बोनस | ऐकून वेतन रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

| अ.क्र | कंत्राटी सेवेचा तपशील | दर प्रती सुरक्षा रक्षक प्रती महिना रु. आकड्यात | दर प्रती सुरक्षा रक्षक प्रती महिना रु. अक्षरी |
|---|---|---|---|
| 1 | शासकीय तंत्रनिकेतन ब्रम्हपुरी या संस्थेला २४x७ तास सुरक्षा रक्षकांच्या सेवा व अनुषंगिक कामे करण्याकरिता,(एक सुरक्षा रक्षक प्रती ८ तास प्रमाणे १० सुरक्षा रक्षक प्रतिदिन ) | | |

शासकीय तंत्रनिकेतन ब्रम्हपुरी या संस्थेच्या कंत्राटी २४x७ तास सुरक्षा रक्षकांच्या सेवा पुरवठा करणेच्या कामासाठी निविदा दरपत्रकात नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य असून भावबंद कराराच्या कालावधीत मागणी नुसार सेवा पुरवठा करण्यास माझी संस्था बांधील आहे.

सादरकर्ता

एजन्सी प्रमुखाचे नाव स्वाक्षरी व शिक्का

ठिकाण :-

तारीख:-